(24)

दिनांक ०५/०७/२०२२

**प्रसिध्दी पत्रक**

**आ.लो.से. श्री.दिनकर कचरु थोरे, वय 55 वर्षे, पद- सहाय्यक फौजदार,नेमणूक-पोलीस ठाणे चिकलठाणा, औरंगाबाद ग्रामीण यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.1000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. सिडको,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.दिनकर कचरु थोरे, वय 55 वर्षे, पद- सहाय्यक फौजदार,नेमणूक-पोलीस ठाणे चिकलठाणा औरंगाबाद ग्रामीण. रा. सुधाकरनगर, बीड बायपास औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 1,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 1,000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. रेशमा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे पोलीस ठाणे चिकलठाणा येथे अपघाताचे गुन्हयातील जप्त वाहन सोडण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे पो.स्टे.चिकलठाणा, औरंगाबाद ग्रामीण येथे दाखल गु.र.नं.254/2022 कलम 304 (अ),279,337,338 भा.दं.वि. मध्ये चारचाकी पेट्रोल टँकर लावण्यात आले होते. सदरचे वाहन सोडण्यासाठी आ.लो.से. दिनकर थोरे यांनी लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी दि. 05/07/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, आ.लो.से. थोरे यांनी 1,000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आजच दि. 05/07/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. दिनकर थोरे यांनी पंच साक्षीदारासमक्ष ठरलेली लाचेची रक्कम 1000/- रुपये पोलीस ठाणे चिकलठाणा समोर, जालना रोड औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. एम. आय. डी. सी. सिडको,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअं/ रविंद्र काळे, राजेंद्र जोशी, विनोद आघाव, चालक-चंद्रकांत बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644944

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

05.07.2022

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.